REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 10 | JULY - 2023

# पुर्व विदर्भातील शेतकऱ्याद्वारे सेंद्रिय व जीवाणू खतांचा वापर: एक अध्ययन

योगेश चितांमण पटले[1] , डॉ. राधेशाम पिलाजी चौधरी[2]
[1] संशोधनकर्ता
[2] मार्गदर्शक, शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविघालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ.

**सारांश**

भारतीय हरित क्रांतीच्या कालावधीत सुधारित बिबियाणे रासायनिक खते व विविध प्रकारची किटकनाशके फवारून उत्पादनात वाढ झाली हे जरी खरे असले तरी त्यामुळे जमीन, पाणी, हवा इत्यादीचे प्रदुषण मोठ्या प्रमाणात वाढले आणि त्यामुळे जमिनीची सुपिकता नष्ट होऊन बहुतांश पिकांचे उत्पादन खुप मोठ्या प्रमाणात घटले या परिस्थितीत जर आपल्याला पीकांची उत्पादकता वाढवुन प्रक्षुण कमी करावयाचे असेल तर सेंद्रिय शेतीकडे वळणे गरजेचे आहे. किंबहुना या सर्व प्रश्नावर सेंद्रिय शेती हा एक उपाय आहे. सेंद्रिय शेतीतील सर्व उत्पादने ग्राहकांच्या पसंतीस आली आणि सेंद्रिय शेती मालाची गरज आज देशभरात आणि महाराष्ट्रात वाढत आहे हे लक्षात घेवून हा संशोधन प्रकल्प निवडला आहे.



**प्रस्तावना**

१९६० च्या दशकात भारतात हरितक्रांती होवून आधुनिक पद्धतीचीशेती करण्यास सुरुवात झाली. या शेतीमध्ये वापरण्यात येणाऱ्या निविष्टा उदा. विविध खते, किटकनाशके, संजीवके इत्यादी. रासायनिक घटकांवर भर दिला गेला. रासायनिक शेतीचा भर भरपुर खते, मुबलक पाणी, किटकनाशकांचा अतिरिक्त वापर, संकरित बियाणे असा होता. या पद्धतीमुळे जमिनीची सुपिकता नष्ट झाली. पर्यावरणाचा ऱ्हास झाला. जैवविविधता नष्ट झाली. पृथ्वीचे तापमान वाढून तिचे अस्तित्व धोक्यात आले. विषयुक्त अन्नग्रहन केल्यामुळे मानवाचे मानसीक आणि शारिरीक आरोग्य धोक्यात आले आहे. कर्करोग, मधुमेह, हृदयविकार, मुत्रविकार अशा अनेक व्याधींनी आज मानवाचे जीवन धोक्यात आले. या सर्वांवर मात करण्यासाठी भविष्य काळात भारतीय लोकांचे जीवन सुखी करण्यासाठी तसेच आपली पृथ्वी, शेती आणि पर्यावरण वाचवण्यासाठी सेंद्रिय शेती हा एक उत्तम उपाय आहे. सेंद्रिय शेती मध्ये सेंद्रिय खंताचा वापर होतो. याच बरोबर जीवाणू खतदेखील एक महत्त्वपूर्ण विकल्प आहे. सेंद्रिय व जीवाणू खते बाजारात किती प्रमाणात उपल्बध आहे? सेंद्रिय व जीवाणू खते वापरण्याची जागरूकता शेतकऱ्यांमध्ये आहे किंवा नाही? सेंद्रिय व जीवाणू खतांचा वापरशेतकरी कोणत्या पद्धतीने करतात? मुख्यत्वे कुठल्या प्रकारच्या पिकाकरिता करतात? सेंद्रिय खत उत्पादकांची विपणन पद्धती कोणत्या प्रकारची आहे? शासनाद्वारे सेंद्रिय खत उत्पादन व विक्रीकरिता काही प्रोत्साहन देण्यात येते काय? तसेच सेंद्रिय व जीवाणू खत विपणनाकरिताशासकीय माध्यमाची मदत होते काय? या व इतर संबंधीत मुद्यांचे उत्तरेशोधण्याकरिता प्रस्तुत संशोधन विषय निवडण्यात आला आहे.

रासायनिक खतांमुळेशेती ही विषयुक्त झाली आहे. विविध प्रकारची खते व औषधे अन्नसाखळीत मिसळून संपूर्ण मानवजातीचे आरोग्य धोक्यात आले आहे. रासायनिक शेतीतून उत्पादीत केलेला भाजीपाला, धान्य, फळे खाऊन आज संपुर्ण जगात कॅन्सर सारख्या व्याधींचे प्रमाण वाढत आहे. हे सर्व टाळण्यासाठी सेंद्रियषेतीचा सखोल अभ्यास करणे, अत्यंत गरजेचे आहे. सेंद्रिय शेतीमूळेच शाश्वत

विकासाचे उद्धिष्ट गाठता येऊ शकते. सेंद्रिय शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांदरम्यान जागरूकता वाढविणे अत्यंत गरजेचे आहे कारण शेती उत्पादनात सेंद्रिय व जीवाणू खतांचे महत्व समजल्यशिवाय सेंद्रिय शेतीची वाढ होणार नाही. सेंद्रिय शेतीमुळे आपण आपल्या पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करुशकतो. अशा प्रकारच्या शेती पद्धतीने नैसर्गिक स्रोताचे पुढच्या पिढीसाठी जतन करता येईल. सेंद्रिय शेतीचा अभ्यास शेतकऱ्यांना व्यापारीदृष्टया व आर्थिकदृष्टया शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरु शकतो. सेंद्रिय शेत मालाला स्थानिक आणि जागतिक बाजारपेठेला मागणी वाढत आहे. वरील बाबींच्या दृष्टिकोनातून सेंद्रिय व जीवाणू खतांचा वापर, विपणन व शासकीय प्रोत्साहन यांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वपूर्ण व गरजेचे आहे

**सारणी क्रमांक १ : क्षेत्रातील शेतकऱ्यांद्वारे सेंद्रिय व जैविक खते वापरण्यासंबंधी ग्रामसेवकांच्या प्रतिक्रिया**

| क्षेत्रातील शेतकरी सेंद्रिय व जैविक खते वापरतात काय ? | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ६८ | ६८०. |
| नाही | २७ | २७०. |
| सांगता येत नाही | ५ | ५०. |
| **एकूण** | **१००** | **१०००.** |
| **Chi-s** | **DF** | **P value** |
| **61.346** | **2** | **<0.05** |

Chi-Square- काई वर्ग मूल्य; df- स्वातंत्र्यांश; Sig-सार्थकता

वरील सारणी क्रमांक १ मध्ये क्षेत्रातील शेतकऱ्यांद्वारे सेंद्रिय व जैविक खते वापरण्यासंबंधी ग्रामसेवकांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ६८.० टक्के ग्रामसेवकांच्या मते क्षेत्रातील शेतकरी सेंद्रिय व जैविक खते वापरतात तर २७.० टक्के ग्रामसेवकांच्या मते क्षेत्रातील शेतकरी सेंद्रिय व जैविक खते वापरत नाही. त्याचप्रमाणे क्षेत्रातील शेतकऱ्यांद्वारे सेंद्रिय व जैविक खते वापरण्यासंबंधी अनिश्चित असणाऱ्याग्रामसेवकांची टक्केवारी ५.० टक्के असल्याचे निदर्शनास आले. क्षेत्रातील शेतकऱ्यांद्वारे सेंद्रिय व जैविक खते वापरण्यासंबंधी ग्रामसेवकांच्या प्रतिक्रियानुसार तुलना केली असता त्यांच्या दरम्यान सार्थक(Chi-sq-61.346; DF-2; $P<0.05$) फरक दिसून आले. बहुतांशग्रामसेवकांच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी सेंद्रिय व जैविक खते वापरतअसल्याचे निदर्शनास आले.

## निष्कर्ष

सारणी क्रमांक १ मधील माहितीनुसार ६८.० टक्के ग्रामसेवकांच्या मते क्षेत्रातील शेतकरी सेंद्रिय व जैविक खते वापरतात तर २७.० टक्के ग्रामसेवकांच्या मते क्षेत्रातील शेतकरी सेंद्रिय व जैविक खते वापरत नाही. त्याचप्रमाणे क्षेत्रातील शेतकऱ्यांद्वारे सेंद्रिय व जैविक खते वापरण्यासंबंधी अनिश्चित असणाऱ्या ग्रामसेवकांची टक्केवारी ५.० टक्के असल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच बहुतांश (Chi-sq-61.346; DF-2; $P<0.05$ ) ग्रामसेवकांच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी सेंद्रिय व जैविक खते वापरतअसल्याचे निदर्शनास आले.

## संदर्भ सूची


- बराडकर, दि. (२००६) सेंद्रिय शेती यशाची पंचसूत्री, मॉफ आणि ओएफआय
- गुंजाळ, स. (२०१५). सेंटरिय शेती उत्पादन, प्रमाणीकरण, शासन, कृषि प्रकाशन पुणे
- गांडूळ शेती माहिती पुस्तिका, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन.
- शिंदे जगन्नाथ, (२०१४) सेंद्रिय शेती, गांडूळ शेती, शाश्वत शेती, गोदावरी पब्लिकशन्स, नाशिक
- कुलकर्णी, महेश, (२०००) विपणनाची तत्वे, निराली प्रकाशन, पुणे

- देशमुख प्रभाकर(१९९७) विपणनाची व्यवस्थापन, विद्या प्रकाशन, नागपूर
- मोर, एस. डी. (२००५). आधुनिक सेंद्रियखते, सन पब्लिकशन्स
- आगलावे, प्र., 'समाजशास्त्रीय संकल्पना आणि सिद्धांत', (२००१), श्री. साईनाथ प्रकाशन; नागपूर
- आगलावे, प्र., 'भारतीय समाज संरचना आणि समस्या', (२००९), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
- कऱ्हाडे, बी. एम., 'शास्त्रीय संशोधन पद्धती', (२०११), पिंपळापूरे अॅन्ड कं पब्लिशर, नागपूर,
- बोधनकर, सु., अलोणी, वि. व कुलकर्णी, मृ., 'सामाजिक संशोधन पध्दती', (१९९३), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती.
- भांडारकर, पु. ल., 'सामाजिक संशोधनपद्धती' (१९७६), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ (दत्तराज प्रकाशन), नागपुर